# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांच्या मुदतवाढीबाबत........

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर नियमित शुल्कासह सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येत आहे त्याचा तसेच विलंब शुल्काच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्य.शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणीप्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ट न झालेले ), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी)ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्य. शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | शनिवार, दिनांक १८/०६/२०२२ ते मंगळवार , दिनांक २१/०६/२०२२ | सोमवार, दिनांक २७/०६/२०२२ ते मंगळवार, दिनांक २८/०६/२०२२ | बुधवार दिनांक २९/०६/२०२२ |
| विलंब शुल्क | बुधवार , दिनांक २२/०६/२०२२ ते रविवार, दिनांक २६/०६/२०२२ | | |

दिनांक १०/०६/२०२२ ते १७/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखा यापूर्वी निश्चित करण्यांत आलेल्या होत्या. परंतु विद्यार्थी हित लक्षात घेता आवेदनपत्रे दि.१८/०६/२०२२ ते दि.२१/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने व दि.२२/०६/२०२२ ते दि.२६/०६/२०२२ पर्यंत विलंब शुल्काने सादर करण्यास मुदत देण्यात येत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे नियमित व विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर करण्याचा तारखा निश्चित करण्यात येत आहेत. मात्र तद्नंतर आवेदनपत्रे नियमित शुल्काने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच या संदर्भात काही अडचणी असल्यास संबंधित मंडळाशी संपर्क साधावा.

दिनांक – १६/०६/२०२२

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र.कोविमं/१२ वी परीक्षा/ 695
दिनांक :- १६/०६/२०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय : जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांच्या मुदतवाढीबाबत----

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी.) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या (Bank of India ) Virtual Account व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच जिल्हा वितरण केंद्रावर सादर कराव्यात.

(दत्तात्रय शंकर पोवार)
प्र.विभागीय सचिव,